## निशाणी क्र.१ खालील आदेश
## [CNR NO.MHAU060018462018]

प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिताचे कलम १५२ नुसार नि.दि.दावा क्रमांक १२५/२००९ मधील दि.१८.१२.२०१७ रोजीच्या निकालपत्रातील आदेशामध्ये आणि हुकूमनाम्यात नमुद करण्याचे राहून गेलेला मजकूर समाविष्ट करण्याबाबत व तशी दुरुस्ती करण्याबाबत दिलेला आहे. अर्जदारातर्फे विधीज्ञ श्री. पी. जी. भारुका आणि मूळ वादीतर्फे विधीज्ञ श्री. व्ही. जी. निंभोरकर यांचा युक्तीवाद ऐकला.

२. नियमीत दिवाणी दावा क्र.१२५/२००९ मौजे माटेगांव, ता. कन्नड येथील गट नं.२४ या मिळकतीच्या वाटपासाठी दाखल करण्यात आला होता. त्यामध्ये प्रतिवादी क्र.१० सादीकूल रहेमान हे होते. त्यांच्या मृत्यूनंतर वारस प्रतिवादी क्र.१०/१ ते १०/१२ यांचा समावेश दाव्यात करण्यात आला होता. त्यांनी कैफियत (नि.९४) मध्ये दावा मान्य करत आपला हिस्सा तुटक करुन त्याचा कब्जा मिळावा अशी मागणी केली होती. त्या अनुषंगाने मुद्दा क्रमांक ४ निश्चित करण्यात आला होता. त्याचा निष्कर्श होकारार्थी नोंदविण्यात आला आहे. प्रस्तुतचा दावा मंजूर करण्यात आला. वादी व प्रतिवादी क्र.१०/१ ते १०/११ हे मागणीप्रमाणे हिस्सा तुटक करुन मिळण्यास पात्र असल्याचा निष्कार्श नोंदविण्यात आला. त्याप्रमाणे अंतिम आदेशामध्ये मयत प्रतिवादी क्र.१० सादीकुल रहेमान यांचा हिस्सा देखील नमुद करण्यात आला. तो हिस्सा प्रतिवादी क्र.१०/१ ते १०/१२ यांना सामाईकात देण्यात यावा असे देखील आदेशात नमुद करण्यात आले. अंतिम आदेश अनुक्रमांक १० मध्ये दावा मिळकती पैकी वादी यांना त्यांचा हिस्सा तुटक करुन त्याचा कब्जा देण्यासाठी दिवाणी प्रक्रिया संहिताचे कलम ५४ नुसार हुकूमनाम्याची प्रत जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे पाठविण्याचे आदेशीत करण्यात आले. त्यामध्ये **प्रतिवादी १०/१ ते १०/१२ यांना** देखील त्यांचा हिस्सा तुटक करुन त्याचा कब्जा देण्यात यावा असे नमुद करणे

अनावधानाने राहून गेले आहे.

**३.** दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५२ मधील तरतूदीनुसार न्यायनिर्णयामध्ये अनावधानाने झालेली चूक अथवा अनावधानाने नमुद करावयाचे राहून गेलेला मजकूर नंतर दुरुस्तीद्वारे न्यायालय स्वतः किंवा एखाद्या पक्षकाराच्या अर्जावरुन समाविष्ट केला जाऊ शकतो. यानुसार, प्रस्तुत अर्जातील परिस्थिती पाहता कोणतीही नवीन दुरुस्ती न्यायनिर्णयामध्ये होत नाही. तर निकालपत्रामध्ये मुद्दा निश्चित करुन ज्याबाबत चर्चा झालेली आहे आणि होकारार्थी निष्कर्श नोंदविण्यात आला आहे त्याबाबतचा मजकूर अंतिम आदेशामध्ये समाविष्ट करता येऊ शकतो. त्यामुळे, आदेशाची अंमलबजावणी होण्यास मदत होईल आणि कुणाचेही नुकसान होणार नाही. या चर्चेअंती खालील आदेश करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर.

२. नि.दि.दा.क्र.१२५/२००९ मधील दि.१८.१२.२०१७ रोजीच्या निकालपत्रात परिच्छेद क्रमांक ४१ कडील अंतिम आदेश क्र.१० मध्ये दावा मिळकतीपैकी वादी या शब्दानंतर ''**आणि प्रतिवादी क्र.१०/१ ते १०/१२''......** अशी दुरुस्ती करण्यात येत आहे.

३. दुरुस्त निकालपत्राची प्रत मूळ दाव्यासोबत जोडण्यात यावी व त्याआधारे दुरुस्ती हुकूमनामा तयार करण्यात यावा.

४. नि.दि.दा.क्र.१२५/२००९ या निकाली प्रकरणाचे कामकाज/संचिका दुरुस्तीसाठी अभिलेख कक्षामधून तात्काळ मागविण्यात यावी आणि दुरुस्त हुकूमनामा तात्काळ तयार करण्यात यावा.

**स्वाक्षरित/-**

**( भु. र. ठाकुर )**

कन्नड सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,

दिनांक १३/११/२०१८ कन्नड

# <u>प्रमाणपत्र</u>

असे प्रमाणित करणेत येते की, पी.डी.एफ.आदेश यामधील सर्व मजकुर मुळ आदेशातील मजकुराप्रमाणे तंतोतंत खरा व बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | – | राजेंद्र महाजन सुंदर्डे, |
| न्यायालयाचे नांव | – | श्री.भू.र.ठाकूर, सह दिवाणी न्यायाधीश, (क.स्तर), तथा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कन्नड. |
| श्रुतलेखन दिल्याचा दिनांक | – | १३.११.२०१८, |
| न्यायिक अधिका–यांनी निकालपत्रावर स्वाक्षरी केलेचा दिनांक | – | १३.११.२०१८, |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | – | १४.११.२०१८, |